## विभाग २.२

### मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाची प्रवाह तक्त्यांमधील तुलना --

सराव पाठास कशाप्रकारे मार्गदर्शन दिले जाते याचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन घटकांनुसार प्रत्येक विषयाचे प्रवाह तक्ते तयार केले, त्यांची तुलना केली असता मराठी पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता व अन्य विषयांचे प्रवाह तक्ते यांच्यामध्ये पुढील बाबतीत साम्य व भेद आढळले. ( सर्व विषयांचे प्रवाह तक्ते विभाग १.२ मध्ये दिलेले आहेत. )

मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शन

( कृपया पृष्ठ क्र. ६१४८५ पाहावेत)

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्त्यावरुन मराठी पाठ-मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते. तर हिंदी पाठ मार्गदर्शनामध्ये प्राथमिक माहिती, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे व मूल्यमापन या घटकांवर प्रामुख्याने चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये मराठी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते, तर हिंदी पाठ मार्गदर्शनात पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर अधिक चर्चा होते.

३) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शनात सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही.

४) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान चक्रे आहेत, तर हिंदीमध्ये अपूर्ण होकारात्मक मोठी चक्रे आहेत, त्यामुळे होणाऱ्या चर्चेत फरक होतो. मराठी पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद, त्यामुळे लघु चर्चा होते, तर हिंदीमध्ये हेतुत: प्रश्न विचारुन विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतला जातो, त्यामुळे चर्चा दीर्घकाळ होते.

५) मराठी पाठ मार्गदर्शनात कमी प्रश्न संख्या; पण विद्यार्थी प्रतिसाद दीर्घकाळ घेतला जातो, त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद असतो. हिंदी पाठ मार्गदर्शनामध्ये मोठ्या संख्येने प्रश्न विचारुन विद्यार्थी प्रतिसाद दीर्घकाळ घेतला जातो, त्यावर प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद अधिक आहे.

दोन्ही मध्ये नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घकाळ व्यक्त केली जाते.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापनावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात, हिंदीमध्ये शिक्षक कृती व विषयज्ञान या घटकांवर प्राध्यापक मार्गदर्शन घेतात.

निष्कर्ष :

वरील निरीक्षणावरुन खालील प्रमाणे निष्कर्ष येतात.

साम्य :

१) मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शन दिल्या जाणाऱ्या घटकांमध्ये सांगड घातली जात नाही.

२) दोन्ही पाठ मार्गदर्शनात प्राध्यापकाची होकारात्मक प्रतिक्रिया असते, नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घकाळ व्यक्त केली जाते.

भेद -

१) हिंदी पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा मूल्यमापन व प्राथमिक माहिती या दोन अधिक घटकांवर चर्चा केली जाते, तसेच शिक्षक-कृती व विषयज्ञानावर मार्गदर्शन केले जाते व मराठीमध्ये मूल्यमापनावर मार्गदर्शन केले जाते.

२) मराठी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावरील चर्चेवर भर आहे; तर हिंदी मध्ये उद्दिष्टे व स्पष्टीकरणावरील चर्चेवर भर अधिक आहे.

३) हिंदी पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शन चर्चेपेक्षा हेतुत: प्रश्न विचारुन विद्यार्थी प्रतिसाद घेतल्यामुळे होणारी चर्चा दीर्घकाळ होते.

## मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन --

( कृपया पृष्ठ क्र.८२ व ८८ पहावेत)

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्रवाह तक्त्यावरुन मराठी पाठ-मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते, तर इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, शिक्षक कृती व मूल्यमापन या घटकांवर चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये मराठी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते, तसेच इंग्रजी पाठ मार्गदर्शनातही विषयज्ञानावर अधिक चर्चा होते.

३) वरील मार्गदर्शन घटकामध्ये मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही.

४) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान चक्रे आहेत. तर इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक लहान चक्रांचे प्रमाण अधिक आहे व पूर्णहोकारात्मक मोठया चक्रांचे अल्प प्रमाण आहे, त्यामुळे होणाऱ्या चर्चेत फरक दिसतो, मराठी पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद, त्यामुळे लघु चर्चा होते, तर इंग्रजीमध्ये विषयज्ञानावर हेतुत: प्रश्न विचारुन विद्यार्थी-प्रतिसाद घेतला गेल्याने चर्चा दीर्घकाळ होते. पण इतर मार्गदर्शन घटकांच्या बाबतीत अकस्मात विद्यार्थी प्रतिसाद घेतल्याने चर्चा लघु चर्चा होते.

५) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात कमी प्रश्न संख्या पण विद्यार्थी-प्रतिसाद दीर्घकाळ घेतला जातो, त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद असतो, तसेच दोन्हीमध्ये नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घकाळ व्यक्त केली जाते.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापनावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात, इंग्रजीमध्ये मार्गदर्शनाचा घटक नाही.

निष्कर्ष :

वरील निरीक्षणावरुन खालील प्रमाणे निष्कर्ष येतात.

साम्य :

१) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शन दिल्या जाणा-या घटकांमध्ये संगह घातली जात नाही.

२) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावरील चर्चेचा अधिक भर आहे.

३) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात प्राध्यापकाची होकारात्मक प्रतिक्रिया असते; पण नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घकाळ व्यक्त केली जाते.

भेद -

१) इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा शिक्षाकृती व मूल्यमापन या दोन अधिक घटकांवर चर्चा केली जाते. मराठी पाठ मार्गदर्शनात मात्र याशिवाय पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे व स्पष्टीकरणे या घटकांवर इंग्रजीपेक्षा जास्त चर्चा होते, तसेच मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापनावर मार्गदर्शन दिले जाते.

२) मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा इंग्रजी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेतल्यामुळे त्यावरील चर्चा दीर्घ काळ होते, अन्य मार्गदर्शन घटकावर लघु चर्चा होते.

मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शन --

( कृपया पृष्ठ क्र. ८२५९१ पाहावेत )

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्त्यावरुन मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान व पाठांचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते, तर इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, शिक्षाकृती व प्राथमिक माहिती या घटकांवर चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकामध्ये मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा होते.

३) इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान व शिक्षक-कृती या दोन घटकामध्ये परस्पर सांगड घातली जाते. मराठीमध्ये मार्गदर्शन घटकांत सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही.

४) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान चक्रे आहेत, तर इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये प्रामुख्याने अपूर्ण होकारात्मक लहान चक्रांचे प्रमाण अधिक आहे व पूर्ण होकारात्मक मोठया चक्रांचे प्रमाण अल्प आहे, त्यामुळे होणा-या चर्चेत फरक दिसतो. मराठी पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद त्यामुळे लघु चर्चा होते, तर इतिहासामध्ये विषयज्ञानावर हेतुत: प्रश्न विचारुन विद्यार्थी प्रतिसाद घेतला गेल्याने ती चर्चा दीर्घ काळ होते, पण इतर मार्गदर्शन घटकांच्या बाबतीत चर्चा लघु चर्चा होते.

५) मराठी पाठ मार्गदर्शनात कमी प्रश्न संख्या पण विद्यार्थी प्रतिसाद दीर्घ काळ घेतला जातो, त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रतिक्रिया असते, तसेच नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते, इतिहास पाठ मार्गदर्शनात मात्र मोठया संख्येने प्रश्न विचारुन त्यावर विद्यार्थी-प्रतिसाद दीर्घ काळ घेतला जातो व त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकाची होकारात्मक प्रतिक्रिया असते, तसेच नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापनावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात. इतिहास पाठ मार्गदर्शनात प्रेरणा व हेतुकथन ,उद्दिष्टे व स्पष्टीकरणे आणि मूल्यमापन या घटकांवर मार्गदर्शन दिले जाते.

<u>निष्कर्ष</u> :

वरील निरीक्षावरुन खालीलप्रमाणे निष्कर्ष येतात :

साम्य -

१) मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान या घटकावर अधिक चर्चा होते.

२) दोन्ही पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया असते व नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

३) दोन्ही मार्गदर्शनात मूल्यमापन घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन देतात.

भेद -

१) इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा शिक्षककृती व प्राथमिक माहिती या दोन अधिक घटकावर चर्चा केली जाते, तसेच प्रेरणा व हेतुकथन व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर मार्गदर्शन दिले जाते.

२) इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये मार्गदर्शन दिल्या जाणाऱ्या घटकांमध्ये मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो.

३) इतिहास पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनाच्या तुलनेत विषयज्ञानावर हेतुत: प्रश्न विचारून प्रतिसाद घेतल्याने दीर्घ काळ चर्चा होते. अन्य घटकावर लघु चर्चा होते.

४) इतिहास पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनाच्या तुलनेत अधिक प्रश्न संख्येने विद्यार्थी प्रतिसाद दीर्घ काळ घेतला जातो.

मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शन --

( कृपया पृष्ठ क्र. ९२व९४ पाहावेत.)

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्त्यावरून मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि

स्पष्टीकरणे यावर चर्चा होते, तर भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, शिक्षक-कृती, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, प्राथमिक माहिती या घटकांवर चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकामध्ये मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते.

३) वरील मार्गदर्शन घटकामध्ये मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही.

४) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान चक्रे आहेत, तर भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक लहान चक्रांचे प्रमाण अधिक आहे. मराठीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद घेतला जातो, त्यामुळे लघु चर्चा होते. भूगोल पाठ मार्गदर्शनात हेतुत: प्रश्न विचारून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद घेतला जातो, त्यामुळे चर्चा दीर्घ काळ होते.

५) मराठी पाठ मार्गदर्शनात कमी प्रश्न संख्या पण विद्यार्थी-प्रतिसाद दीर्घ काळ घेतला जातो. त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रतिक्रिया असते. तसेच नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घकाळ व्यक्त केली जाते.

भूगोल पाठ मार्गदर्शनात जास्त संख्येने प्रश्न विचारून त्यावर विद्यार्थी-शिक्षकाला दीर्घ काळ बोलू दिले जाते, तसेच त्यावर प्राध्यापक दीर्घ काळ होकारात्मक प्रतिसादच व्यक्त करतात.

६) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापन या घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात.

निष्कर्ष :

साम्य :

१) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते.

२) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये मार्गदर्शन दिल्या जाणाऱ्या घटकांमध्ये सांगड घातली जात नाही.

३) तसेच मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापन या घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात.

भेद --

१) भूगोल पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा शिक्षक कृती व प्राथमिक माहिती या दोन अधिक घटकांवर चर्चा केली जाते.

२) भूगोल पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनाच्या तुलनेत हेतुत: प्रश्न विचारुन विद्यार्थी प्रतिसाद घेतल्यामुळे दीर्घकाळ चर्चा होते.

३) भूगोल पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनाच्या तुलनेत जास्त प्रश्न संख्येने विद्यार्थी प्रतिसाद दीर्घ काळ घेतला जातो व त्यावर प्राध्यापक होकारात्मकच प्रतिसाद देतात.

मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शन --

( कृपया पृष्ठ क्र.८२ व ९७ पाहावेत)

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्त्यावरुन मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते; तर शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, शिक्षक कृती व मूल्यमापन या घटकांवर चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते; तर शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृतीवर अधिक चर्चा केली जाते.

३) वरील मार्गदर्शन घटकामध्ये मराठी पाठ मार्गदर्शनात सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही, पण शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान व शिक्षक-कृती या घटकांमध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो.

४) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक नकारात्मक लहान चक्रांचे प्रमाण जास्त आहे, तसेच विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद घेतला जातो त्यामुळे होणारी चर्चा लघु चर्चा होते.

५) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये कमी प्रश्न संख्या, पण विद्यार्थी प्रतिसाद मात्र दीर्घकाळ घेतला जातो. त्यावर मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रतिक्रिया असते, तसेच नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापन घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन, तर शास्त्र पाठ मार्गदर्शनात शैक्षणिक साधनांचा वापर व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात.

निष्कर्ष :

साम्य --

१) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद घेतल्याने लघु चर्चा होते.

२) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये प्राध्यापकांची विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया असते व नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

भेद -

१) शास्त्र पाठ मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा प्रेरणा व हेतुकथन, शिक्षक कृती व मूल्यमापन या तीन अधिक घटकांवर चर्चा होते, तर मराठी पाठ मार्गदर्शनात उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावर शास्त्रापेक्षा अधिक चर्चा होते. त्याचप्रमाणे मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापनावर मार्गदर्शन होते, तर शास्त्रा--मध्ये शैक्षणिक साधनांचा वापर व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात.

२) मराठी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा होते, तर शास्त्रामध्ये शिक्षक कृतीवर अधिक भर दिला जातो.

३) शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये मार्गदर्शन दिल्या जाणाऱ्या घटकांमध्ये मराठी मार्गदर्शनापेक्षा सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो.

मराठी व गणित पाठ मार्गदर्शन --

( कृपया पृष्ठ क्र.८२,१००पहावेत.)

विरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) मराठी व गणित पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्त्यांवरुन मराठी पाठ-मार्गदर्शनात विषयज्ञान,पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते,तर गणित पाठ मार्गदर्शनामध्ये प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान,शिक्षक कृती,मूल्यमापन व प्रश्न पद्धती या घटकांवर चर्चा होते.

२) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये विषयज्ञानावर अधिक चर्चा केली जाते, तर गणित पाठ मार्गदर्शनामध्ये प्रेरणा व हेतुकथन या घटकावर अधिक चर्चा केली जाते.

३) वरील मार्गदर्शन घटकांमध्ये मराठी पाठ मार्गदर्शनात सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात नाही,पण गणित पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान व शिक्षक कृती या घटकांमध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो.

४) मराठी व गणित पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान खंडांचे प्रमाण अधिक आहे, तसेच विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद घेतला जातो,त्यामुळे चर्चा लघु चर्चा होते.

५) मराठी व गणित पाठ मार्गदर्शनामध्ये कमी प्रश्न संख्या असून विद्यार्थी प्रतिसाद मात्र दीर्घ काळ घेतला जातो,त्यावर मार्गदर्शकाची होकारात्मक प्रतिक्रिया असते,तसेच नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात मूल्यमापन या घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन देतात,तर गणित पाठ मार्गदर्शनात प्राध्यापक पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर स्वत: मार्गदर्शन करतात.

**निष्कर्ष :**

**साम्य :**

१) मराठी व गणित पाठ मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षकाचा अकस्मात प्रतिसाद घेतल्याने लघु चर्चा होते.

२) मराठी व गणित पाठ मार्गदर्शनात प्राध्यापकांची विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया असते व नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्यास ती दीर्घ काळ व्यक्त केली जाते.

**भेद --**

१) गणित पाठ मार्गदर्शनामध्ये मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा प्रेरणा व हेतुकथन, शिक्षक कृती, मूल्यमापन व प्रश्न पद्धती या तीन अधिक घटकांवर चर्चा केली जाते, तसेच मराठीमध्ये उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावर गणितापेक्षा अधिक चर्चा होते, त्याचप्रमाणे मराठीमध्ये मूल्यमापनावर प्राध्यापक मार्गदर्शन व गणित पाठ मार्गदर्शनात पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणावर प्राध्यापक मार्गदर्शन करतात.

२) मराठी पाठ मार्गदर्शनात विषयज्ञानावर अधिक चर्चा होते तर गणित पाठ मार्गदर्शनाला प्रेरणा व हेतुकथनावर अधिक चर्चा होते.

३) गणित पाठ मार्गदर्शनामध्ये मार्गदर्शन दिल्या जाणा-या घटकांमध्ये मराठी पाठ मार्गदर्शनापेक्षा सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो.

## विभाग २.३

### मराठी व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाची प्रश्नावलीनुसार तुलना --

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यामध्ये तुलना करण्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांसाठी दिलेल्या प्रश्नावलीनुसार तुलना केली, त्यासाठी प्रत्येक प्रश्नाच्या निष्कर्षांचा तुलनात्मक विचार करता विविध विषय अध्यापनपद्धती व मराठी अध्यापनपद्धती यांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये दिसून येणारे साम्य व भेद पुढीलप्रमाणे आहेत. ( भाग १.३ मधील निष्कर्ष कृपया पहावेत )

### मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शन --

साम्य :

१) मराठी व हिंदी अध्यापनपद्धतीच्या पाठ मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी पाठ टाचण न काढता किंवा त्रोटक पाठ टाचण घेऊन आला तर मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत.

२) दोन्ही अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाची सुरवात प्रेरणेपासून करतात.

३) पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता येत नसेल तर तो संदर्भ शोधण्यास, वाचन करण्यास सांगतात, काही प्राध्यापक तो स्वत: सांगतात.

४) प्रेरणा सुचत नसल्यास ती प्राध्यापक स्वत: सांगतात, तसेच मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शक प्रेरणेमध्ये (अ) घटकानुरुपता, (ब) प्रेरणा देणाऱ्या कृती, (क) प्रस्तावनेची हेतुकथनाशी सांगड व (ड) प्रेरणेचा परिणाम या क्रमांना महत्त्व देतात.

५) पाठ टाचणामध्ये मुद्दे-उपमुद्दे नसल्यास ते काढल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. मात्र काही प्राध्यापक ते कसे काढावेत याचे मार्गदर्शन देतात, पाठ टाचणातील प्रत्येक मुद्दयावर चर्चा, स्पष्टीकरण केले जाते, आशय सविस्तर सांगितला

जातो, मात्र घटकाशी निगडित आशय सांगितला जात नाही, तसेच चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन व माहिती दिली जाते.

६) उद्दिष्टांवरील मार्गदर्शनात ती घटकानुरुप असणे व नेमकी, योग्य लिहिणे या बाबींकडे लक्ष दिले जाते. तसेच विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टांत बदल केल्यास त्या मागील कारण सांगितले जाते.

७) शैक्षणिक साधनांच्या वापरासंबंधी बहुसंख्य प्राध्यापक ती दाखविण्यास सांगतात, त्यांच्या कल्पना सुचवितात व त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात.

८) मराठी-हिंदी पाठ मार्गदर्शक शिक्षक कृतीवरील मार्गदर्शनात आशय, प्रश्न, शैक्षणिक साधने व अध्यापन मुद्दे या घटकांच्या क्रमानुसार मार्गदर्शन करतात, तसेच शिक्षक कृतीत कथन, प्रश्न या क्रमात साम्य आहे.

९) मूल्यमापन प्रश्नांसंदर्भात उद्दिष्टे, पाठयांश यास अनुसरुन चर्चा होते, काही प्राध्यापक प्रश्न रचना व स्वरुप यानुसार चर्चा करतात. तसेच मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापन प्रश्नांचे स्वरुप सांगतात, काही प्राध्यापक मात्र सुरवातीलाच फक्त सांगतात.

१०) स्वाध्याय चर्चेत उद्दिष्ट, आशय, घटकाचे दृढीकरण या दृष्टीने चर्चा करतात. स्वाध्यायातील अपेक्षित सुधारणा चर्चेतून करुन घेतात.

११) फलक लेखनावरील मार्गदर्शनात दोन्ही मार्गदर्शक प्राध्यापक लेखन मुद्देसूद, शुध्द, सुवाच्य अक्षर व फलकावर घटक, इयत्ता, दिनांक, शब्द, वाक्प्रचार असणे यावर चर्चा करतात.

१२) दोन्ही पाठ मार्गदर्शनात १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, २) पाठमुद्दे ३) शिक्षक, विद्यार्थी-कृती ४) प्रेरणा ५) पूर्वज्ञान या घटकांना अधिक वेळ देतात, सर्व घटकांवर मार्गदर्शन दिले जाते. मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतला जातो.

भेद --

१) मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचण त्रोटक असेल तर त्या त्रोटक मुद्दयावर चर्चा करतात. तसेच ते पूर्ण करण्यापूर्वी आशय,

उद्दिष्टे, शैक्षणिक साधने व मूल्यमापन या बाबींकडे लक्ष देण्यास सांगतात.

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक त्रोटक टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, पाठाच्या पायऱ्या, घटकाचे वाचन, मुद्दे या बाबींकडे लक्षवेध करतात.

२) पूर्वज्ञानावरील चर्चेमध्ये मराठी मार्गदर्शनात प्रामुख्याने आशय व पूर्वज्ञान यांची सांगड घातली जाते, तर हिंदीमध्ये मागील पाठावर चर्चा केली जाते.

३) मुद्दयाचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला आले नाही तर मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ते कसे करावे यावर मार्गदर्शन देतात. तर हिंदी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वत: त्या मुद्दयाचे स्पष्टीकरण करतात.

४) पाठाचा आशय मराठी विषयाचे पाठ मार्गदर्शक सविस्तर सांगतात व घटकानुसार अधिक उद्दिष्टे आवश्यक वाटल्यास प्राध्यापक ती काढा असे सांगतात.

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक उद्दिष्टे स्वत: सांगतात, काही प्राध्यापक ती लिहा असे सांगतात.

५) शिक्षक कृतीवरील चर्चेत मराठी मार्गदर्शक प्राध्यापक कथन, प्रश्न, विद्यार्थी सहभाग व शैक्षणिक साधने याप्रमाणे घटकांना प्राधान्य देतात.

हिंदी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक कथन, प्रश्न, शैक्षणिक साधने व विद्यार्थी सहभाग असा क्रम देतात.

६) विद्यार्थी कृतीवरील चर्चेत मराठीमध्ये उत्तरे, प्रश्न इ. वर चर्चा केली जाते. हिंदी मार्गदर्शनात कृती, शारीरिक, शाब्दिक सहभागावर भर दिला जातो.

७) स्वाध्याय चर्चेमध्ये मराठी मार्गदर्शनात प्राध्यापक कृतिशिलता, मनोरंजकता, अभिरुची या दृष्टीने चर्चा करतात. हिंदीमध्ये श्रवण, भाषण, पठण, लेखन यांच्या विकासाच्या दृष्टीने चर्चा केली जाते.

८) पाठ टाचण वेळेवर न दाखविल्यास मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ- मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत, हिंदी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक समज देऊन मार्गदर्शन देतात.

९) मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग मराठी पाठ- मार्गदर्शक अल्प प्रमाणात घेतात. हिंदीमध्ये तो मध्यम स्वरुपात घेतात.

१०) मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली तर मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक बरोबर उत्तरासाठी प्रश्न चर्चा करतात,पण हिंदी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला अधिक वाचन करुन मग मार्गदर्शन घ्यावयास सांगतात.

मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन--

साम्य :

१) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढता पाठ टाचण मार्गदर्शनासाठी आल्यास मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत.

२) मराठी व इंग्रजी दोन्ही पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाची सुरुवात पूर्वज्ञानापासून करतात.

३) पूर्वज्ञानावर चर्चा करताना दोन्ही मार्गदर्शनामध्ये पूर्वज्ञान व नवीन आशय यांची सुसंगती व मागील पाठ या बाबी पाहतात.

४) प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन करताना घटकानुरुपता,प्रेरणा देणाऱ्या कृती, प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड व प्रेरणेचा , प्रस्तावनेचा परिणाम या बाबींचा क्रम दोन्ही मार्गदर्शनात समान आहे.

५) पाठ टाचणामधील अध्यापन मुद्दयावर चर्चा करताना मुद्दे,उपमुद्दे नसल्यास पाठ मार्गदर्शक मार्गदर्शन देत नाहीत. काही प्राध्यापक मात्र मुद्दे,उपमुद्दे कसे काढावेत याचे मार्गदर्शन देतात,त्याचप्रमाणे मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात. चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देतात.विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात,पाठाचा आशय सविस्तर सांगतात,मात्र घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

६) उद्दिष्टांवरील मार्गदर्शनात घटकानुरुपता,नेमकी व योग्य लिहिणे या बाबींवर चर्चा करतात.

७) शैक्षणिक साधनांचा पाठ नियोजनात समावेश नसल्यास ती दाखविण्यास,त्यांची कल्पना सुचविणे व उपलब्धतेविषयी माहिती देतात.

८) शिक्षक कृतीवर चर्चा करताना दोन्ही पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न, शैक्षणिक साधने, पाठाच्या पायऱ्या, पूर्वज्ञान ते स्वाध्याय सर्व कृती पाहतात. या चर्चेत विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात, या दोन्ही मार्गदर्शकांनी फलक लेखन हा शिक्षक कृतीतील एक चर्चेचा घटक सुचविला आहे.

९) मूल्यमापन प्रश्नासंदर्भात मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात पाठयांश, उद्दिष्टे यानुसार प्रश्न, प्रश्न प्रकार व रचना तसेच प्रश्न संख्या यावर चर्चा करतात. बहुसंख्य प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात, काही प्राध्यापक फक्त सुरवातीला सांगतात.

१०) स्वाध्यायावर चर्चा करताना पाठाचा आशय, उद्दिष्टे व पाठयांशाचे दृढीकरण या बाबी पाहतात. विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असल्यास तो चर्चेतून व मार्गदर्शनातून सुचवितात.

११) फलक लेखन चर्चेत, मुद्देसूद लेखन, सुवाच्य, चांगले अक्षर व फलकाच्या दोन भागात लेखनाचे नियोजन या बाबींवर दोन्ही मार्गदर्शक प्राध्यापक लक्ष देतात.

१२) पाठ मार्गदर्शनात ज्या घटकांना अधिक वेळ दिला जातो त्यामध्ये उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, पाठयमुद्दे, शिक्षक-विद्यार्थी कृती, प्रेरणा, पूर्वज्ञान या घटकांच्या क्रमामध्ये समानता आहे.

१३) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनातील सर्व घटकांवर लक्ष देतात. सदर पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकांचा खूपच प्रमाणात सहभाग घेतात. काही प्राध्यापक मात्र मध्यम स्वरुपात सहभाग घेतात. तसेच पाठ टाचण कच्चे वाटल्यास आहे त्या टाचणात सुधारणा सुचवितात व अधिक वाचन, अभ्यास शैक्षणिक साधनांचा आग्रह धरतात.

१४) पाठ उद्या व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनात आला तर मराठी व इंग्रजी प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. समज देऊन तो रद्द करतात, काही प्राध्यापक समज देऊन मार्गदर्शन करतात.

## मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन --

भेद :

१) विद्यार्थी-शिक्षक त्रोटक पाठ टाचण घेऊन मार्गदर्शनास आल्यास मराठी पाठ मार्गदर्शक त्रोटक भागावर मार्गदर्शन, चर्चा करतात. मात्र इंग्रजी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक टाचण पूर्ण असल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, काही प्राध्यापकच त्रोटक भागावर चर्चा करतात व ते पूर्ण करण्यापूर्वी मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठाचा आशय, पद्धती, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शैक्षणिक साधने, मूल्यमापनावर लक्ष वेधतात तर इंग्रजी पाठ मार्गदर्शक पाठाच्या पायऱ्या, मुद्दयांचे स्पष्टीकरण, इतर पाठ टाचणांचे नमुने पाहणे या बाबींवर लक्ष वेधतात, काही प्राध्यापक उद्दिष्टे व मूल्यमापनावर लक्ष देण्यास सांगतात.

२) पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शन घटकाच्या क्रमामध्ये पूर्ण भिन्नता आहे.

३) पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करताना मराठी पाठ मार्गदर्शनात पूर्वज्ञान व प्रेरणा, यांच्या संबंधावर मागील पाठ, लेखक, सध्याच्या पाठाचे लेखक, त्यांची पुस्तके यावर प्रश्न विचारतात. तर इंग्रजी पाठ मार्गदर्शनात पूर्वज्ञान अपेक्षेप्रमाणे नसेल तर, हा पाठ कशावर आधारित आहे, गृहीत पूर्वज्ञानाच्या पाठ, कविता, लेखक, इयत्ता, तसेच दैनंदिन अनुभव या बाबींवर लक्ष वेधतात. या संबंधीचा मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता आला नाही तर मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक तो संदर्भ वाचायला सांगतात. काही प्राध्यापक तो संदर्भ स्वत: सांगतात, मात्र इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्रश्न चर्चेतून लक्षात आणून देतात. काही प्राध्यापक तो संदर्भ वाचायला सांगतात.

४) प्रेरणा विद्यार्थी-शिक्षकाला सुचत नसल्यास मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणा स्वत: सांगतात. काही प्राध्यापक मात्र प्रश्न, उदाहरणाव्दारे प्रेरणा देण्यास प्रवृत्त करतात.

तर इंग्रजी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न, उदाहरणांतून प्रेरणा देण्यास विद्यार्थी-शिक्षकाला उद्युक्त करतात.

५) टाचण व्यवस्थित लिहितो पण विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न आल्यास मराठी मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन करायला सांगतात तर इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न चर्चा करुन आशयाचे मार्गदर्शन करतात.

६) उद्दिष्ट चर्चेत मराठीमध्ये घटकानुरुपता व ती नेमकी लिहिणे यावर भर दिला जातो. तर इंग्रजीमध्ये घटक, वर्तन बदलाचे दृश्य वर्तन यावर चर्चा करतात. काही प्राध्यापक उद्दिष्टांचा क्रम योग्य लिखाण व साध्य होणारी आहेत का या बाबी पहातात. पाठ्यांशाला अनुसरुन अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास मराठी पाठ मार्गदर्शक ती काढायला सांगतात. काही प्राध्यापक चर्चेतून लक्षात आणून देतात व उद्दिष्ट बदलामागील कारण सांगतात. इंग्रजी पाठ मार्गदर्शक अशी उद्दिष्टे स्वत: सांगतात. काही प्राध्यापक अधिक उद्दिष्टे काढण्यासंबंधी सूचना देतात, तसेच उद्दिष्टे व स्पष्टीकरणाच्या बदलामागील कारण सांगत नाहीत.

७) शिक्षक कृतीवर चर्चेत मराठी आशय व स्पष्टीकरण या बाबींवर भर देतात, पण इंग्रजी पाठ मार्गदर्शक विद्यार्थ्यांचा कृतियुक्त, शाब्दिक सहभाग, शब्द परिचय व त्याची साधने, वस्तू, उदाहरणे, कृती, स्ट्रक्चर, चेतक विविधता, कथन या बाबींवर चर्चा करतात या शिक्षक कृतीतील घटकांना दिले जाणारे महत्त्वानुसार क्रम, अनुक्रम-कथन-प्रश्न-विद्यार्थी सहभाग व शैक्षणिक साधन व कथन-विद्यार्थी सहभाग-प्रश्न व नंतर शैक्षणिक साधन असा भिन्न आहे. इंग्रजीमध्ये शिक्षक कृतीत ड्रिलिंग हा अन्य सुचविलेला वेगळा घटक आहे.

८) मराठी पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी कृतीवरील चर्चेत प्रश्न व पूर्णवाक्यात उत्तरे, विद्यार्थी प्रेरणा यावर भर असतो. तर इंग्रजीमध्ये शारीरिक, मानसिक, कृतियुक्त सहभाग व तो कोणकोणत्या ठिकाणी घ्यावा, अवधान खेचणे यावर भर.

९) फलक लेखनासंदर्भात मराठी पाठ मार्गदर्शक शुद्धलेखन, घटक, इयत्ता, दिनांक, शब्द, वाक्प्रचार यावर चर्चा करतात, तर इंग्रजीमध्ये अक्षर सरळरेषेत, आकारबद्ध, योग्य अंतर, नेमके, अधोरेखन, रंगीत खडू व योग्य तिथे कॅपिटल अक्षर यावर चर्चा करतात. त्याचप्रमाणे मराठीत हेतुप्रश्न, सुवाच्यता, रेखीवपणा, वळणदारपणा, सरळ रेषेत, सुव्यवस्थित नियोजन यावर सूचना देतात. इंग्रजीमध्ये फलकाच्या दोन

दोन भागात लेखन, मुद्दे व संकलन लेखन, शुद्धलेखन व सर्व मुद्दयांचे लेखन यावर लक्ष घेतात.

१०) मार्गदर्शनात अधिक वेळ दिला जाणाऱ्या घटक क्रमामध्ये फलक लेखन, मूल्यमापन साधने, शैक्षणिक साधने, उपयोजन व संकलन या क्रमात भिन्नता आहे. मराठीमध्ये शैक्षणिक साधनाकडे दुर्लक्ष तर इंग्रजीमध्ये पूर्वज्ञान, उपयोजनाकडे दुर्लक्ष होते.

११) एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थ्यांचा सहभाग अनुक्रमे अल्प व मध्यम आहे.

१२) विद्यार्थी-शिक्षकाने प्रश्नाचे उत्तर चुकीचे दिले तर मराठी पाठाचे मार्गदर्शक न रागावता प्रश्न विचारुन बरोबर उत्तर काढून घेतात. पण इंग्रजी पाठाचे मार्गदर्शक विद्यार्थी-शिक्षकाला अधिक अभ्यास करण्यास सांगतात. काही प्राध्यापक न रागावता प्रश्नांव्दारे बरोबर उत्तर काढून देतात.

मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शन --

साम्य :

१) विद्यार्थी-शिक्षक टाचण न काढता आल्यास मार्गदर्शन देत नाहीत.

२) मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात. पूर्वज्ञानासंदर्भात पूर्वज्ञान व आशय यांतील सुसंगती, मागे अभ्यासलेला पाठ, इयत्ता, पूर्वानुभव यावर चर्चा करतात. तसेच पूर्वज्ञान व प्रेरणा , घटक, मागील इयत्ता, पाठ लेखक, कालखंड यावर लक्ष घेतात सूचना व प्रश्न करतात.

३) प्रेरणेवर चर्चा करताना त्यातील घटकानुरुपता, प्रेरणा देणाऱ्या कृती, हेतुकथनाशी प्रेरणेची घातलेली सांगड व प्रेरणेचा परिणाम हा क्रम समान आहे.

४) पाठ टाचणात मुद्दे , उपमुद्दे नसल्यास ते लिहायला सांगतात. त्याशिवाय मार्गदर्शन नाही. अध्यापन मुद्दयावरील चर्चेत प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात, अवांतर वाचन देतात. तसेच मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात. विद्यार्थी-

शिक्षकाला स्पष्टीकरण न आल्यास ते कसे करावे याची चर्चा करतात. पाठाचा सविस्तर आशय सांगतात, पण पाठ्य घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

५) उद्दिष्टे व स्पष्टीकरणावरील मार्गदर्शनात मराठी व इतिहास पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक घटकानुरुपता, ती नेमकी योग्य लिहिणे, काही प्राध्यापक उद्दिष्टांचा क्रम यावर भर देतात, तसेच उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारण सांगतात.

६) शैक्षणिक साधनांचा पाठयघटकानुसार पाठ नियोजनात समावेश नसल्यास दोन्ही मार्गदर्शनात शैक्षणिक साधने दाखविणे, कल्पना सुचविणे व उपलब्धतेची माहिती देणे या बाबी करतात.

७) शिक्षक कृतीवर मार्गदर्शन करताना आशय, स्पष्टीकरण तक्ते, प्रश्न, कृती, पूर्वज्ञान ते स्वाध्यायाखेर कृती व अध्ययन अनुभवाची योग्यायोग्यता पाहतात, या चर्चेत प्राध्यापक अवांतर माहिती देतात. तसेच दोन्ही मार्गदर्शक शिक्षक कृतीत फलक लेखन हा एक अधिक घटक सुचवितात.

८) मूल्यमापन प्रश्नासंदर्भात प्रश्न प्रकार व रचना यावर दोन्ही मार्गदर्शक भर देतात. तसेच मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप बहुसंख्य प्राध्यापक सांगतात, काही प्राध्यापक मात्र फक्त सुरवातीलाच सांगतात.

९) स्वाध्यायावरील चर्चेत मराठी, इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय घटकानुरुपता, त्याचे दृढीकरण यावर चर्चा करतात व विद्यार्थी-शिक्षकाच्या स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असल्यास ती मार्गदर्शनातूनच सुचवितात. काही प्राध्यापक बदल करा असे सांगतात.

१०) पाठ उद्‌दया आहे व मार्गदर्शनासाठी विद्यार्थी-शिक्षक आल्यास दोन्ही अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक पाठ रद्द करतात. मार्गदर्शन देत नाहीत, मात्र काही प्राध्यापक समज देऊन मार्गदर्शन करतात.

११) मार्गदर्शनातील सर्व घटकांकडे लक्ष दिले जाते.

१२) तसेच मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात, तसेच एका मार्गदर्शनाचेवेळी अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा अल्प सहभाग घेतात.

१३) विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणातच सुधारणा केली जाते. मार्गदर्शक अधिक, वाचन, अभ्यास व साधने यांचा आग्रह धरतात.

१४) मराठी व अन्य पाठ मार्गदर्शनात फरक आहे.

भेद :

१) पाठ टाचण त्रोटक असल्यास मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक त्रोटक भागावर चर्चा करतात; पण इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ते पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, ते पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मराठी मार्गदर्शनात आशय, पद्धती, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शैक्षणिक साधने व मूल्यमापन यावर सूचना देतात तर इतिहास पाठ मार्गदर्शक पाठाच्या पाय-या, पूर्वज्ञान, शिक्षक कृती, उद्दिष्टे, मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन अनुभव, कृती व अवांतर माहिती, संदर्भ, पाठाचे वाचन यावर लक्ष वेधतात.

२) पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शनाच्या घटकांच्या क्रमामध्ये पूर्ण भिन्नता आहे.

३) पूर्वज्ञानावर चर्चा करताना मराठीमध्ये पाठ लेखक तर इतिहासात कालखंड व दैनंदिन अनुभवावर चर्चा होते. पूर्वज्ञानासंबंधीचा मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला आला नाही तर मराठी मार्गदर्शक प्राध्यापक ते संदर्भ वाचायला सांगतात, काही प्राध्यापक तो संदर्भ स्वतः सांगतात, पण इतिहासामध्ये बहुसंख्य प्राध्यापक स्वतः मागील संदर्भ सांगतात. काही प्राध्यापक प्रश्न चर्चा करून लक्षात आणून देतात.

४) प्रेरणा विद्यार्थी-शिक्षकाला सुचत नसल्यास मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ती स्वतः सांगतात, काही प्राध्यापक ती प्रश्न चर्चेतून सुचवितात.

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्नातूनच विचाराला चालना देतात, काही प्राध्यापक प्रेरणेचे प्रकार सांगून योग्य ती निवडण्यास सांगतात.

५) पाठ टाचण व्यवस्थित असते, पण विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न आल्यास मराठी पाठ मार्गदर्शनाचे प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास करायला सांगतात.

इतिहास पाठ मार्गदर्शक प्रश्न विचारून अभिव्यक्ती वाढविण्याचा प्रयत्न करतात. काही प्राध्यापक अधिक अभ्यासाची सूचना करतात.

६) उद्दिष्टांवरील चर्चेत पाठ्यघटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास मराठी विषयाचे बहुसंख्य पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक उद्दिष्टे काढण्याची सूचना देतात. मात्र काही प्राध्यापक ती चर्चेतून लक्षात आणून देतात.

इतिहास मार्गदर्शक प्राध्यापक बहुसंख्येने चर्चेतूनच लक्षात आणून देतात व काही प्राध्यापक अधिक उद्दिष्टे काढायला सांगतात.

७) शिक्षक कृतीवरील चर्चेत महत्त्वाच्या घटकांचा क्रम मराठी व इतिहासात भिन्न आहे, कथन-विद्यार्थी सहभाग - कथन - प्रश्न असा बदल आहे. शिक्षक कृतीमध्ये इतिहासात अन्य घटकामध्ये चेतक बदल हा अधिक घटक सुचविला आहे.

८) विद्यार्थी कृतीवरील चर्चेत मराठीमध्ये प्रश्न, पूर्णवाक्यात उत्तर व विद्यार्थी प्रेरणा यावर भर आहे.

इतिहासामध्ये मात्र विद्यार्थी कृतींचा बोध शिक्षक कृतीनुसार असणे उदा.कथन - श्रवण, निरीक्षण इ. तसेच काही प्राध्यापक विद्यार्थी सहभाग व त्याची ठिकाणे यावर भर देतात.

९) मूल्यमापनातील प्रश्नांसंदर्भात मराठी मार्गदर्शनात पाठ्यांश,उद्दिष्टे यानुसार प्रश्न,प्रश्न प्रकार व रचना या बाबी पाहतात.

इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये प्रश्न प्रकार,लघुत्तरी,दीर्घोत्तरी, सोपे,कठीण,निम्न,उच्च इत्यादीवर चर्चा होते. काही प्राध्यापक पाठ्यांश, उद्दिष्टानुसार प्रश्न व एकावेळी एक संकल्पना यावर चर्चा होते.

१०) स्वाध्याय चर्चेमध्ये मराठीत उद्दिष्टानुसार स्वाध्याय तर इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यांचे प्रकारांवर भर देतात. तर काही प्राध्यापक वयोगट,उद्दिष्टे,अभिरुची,सर्जनशीलता,मनोरंजकता यावर भर देतात. सुधारणा हवी असल्यास स्वाध्याय बदला असे सांगतात.

११) फलक लेखन चर्चेत मराठीमध्ये मुद्देसूदपणा, सुवाच्य लेखन, फलकाचे दोन भाग,शुध्दलेखन, घटक,इयत्ता,दिनांक, शब्द, वाक्प्रचार यावर चर्चा होते. तसेच हेतुप्रश्न, सुवाच्यता,रेखीवपणा,वळणदारपणा, सरळ रेषेत अक्षर व सुव्यवस्थितपणा यावर सूचना देतात.

इतिहास पाठ मार्गदर्शनात फलक लेखन चर्चेत महत्त्वाचे मुद्दे, उपमुद्दे,संकलन,सारांश,सन,व्यक्ती,सुवाच्य, अचूक,सरळ रेषेत लेखन, आकृतीला नावे,दोन भागात लेखन व रंगीत खडूंचा वापर यावर चर्चा होते.तसेच वरील त्रुटीनुसार मुद्दे,उपमुद्दे,सन,घटना, लेखन बिनचूक व सरळ रेषेत ,वळणदार मुद्देसूद,विधानात्मक लेखन करो, दोन भागात होण्यासंबंधी सूचना दिल्या जातात.

१२) मार्गदर्शनात घटकाला दिल्या जाणाऱ्या वेळानुसार आलेला घटक क्रम दोन्हीत भिन्न आहे,त्याचप्रमाणे मराठीत शैक्षणिक साधन या घटकावरील मार्गदर्शनात दुर्लक्ष होते व इतिहासात मूल्यमापन साधने,संकलन,उपयोजन,फलक लेखन, पूर्वज्ञान,पाठय-मुद्दे असे घटक दुर्लक्षित होतात.

१३) पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक न रागावता प्रश्न विचारुन बरोबर उत्तर काढून घेतात.

इतिहास पाठ मार्गदर्शक अधिक वाचन व अभ्यास करुन मग मार्गदर्शन घ्यायला सांगतात,काही प्राध्यापक मात्र प्रश्न चर्चेतून दुरुस्ती करुन घेतात.

मराठी भूगोल पाठ मार्गदर्शन --

साम्य :

१) विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढता मार्गदर्शनास आल्यास मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक कच्चे टाचण असल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत.

२) मार्गदर्शनाची सुरुवात पूर्वज्ञानापासून होते.

३) पूर्वज्ञानावरील चर्चेत पाठयांश,पूर्वीचा अभ्यासलेला पाठ,इयत्ता, अनुभव व काही प्राध्यापक नवीन ज्ञान व पूर्वज्ञान यातील संगति यावर चर्चा करतात.

४) प्रेरणेमधील चर्चेत घटकानुरुपता,प्रेरणा देणाऱ्या कृती,प्रेरणेची हेतुकथनाशी संगति व प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे घटकाला महत्त्वानुसार क्रम देतात.

५) पाठ टाचणात मुद्दे - उपमुद्दे नसल्यास ते लिहायला सांगतात, त्याशिवाय टाचण तपासत नाहीत.भूगोलाचे काही प्राध्यापक मात्र मार्गदर्शनातून मुद्दे,उपमुद्दे सुचवितात.मार्गदर्शनात प्रत्येक मुद्दयांवर चर्चा करतात.चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देतात.स्पष्टीकरण विचारतात,पाठाचा आशय सविस्तर सांगतात.

६) उद्दिष्टावरील मार्गदर्शनात - मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शक उद्दिष्टांचा क्रम,घटकानुरुपता,ती नेमकी व योग्य लिहिणे उदा.एकावेळी एक कृती, एकवचनी,या बाबींवर चर्चा करतात,तसेच उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारण सांगतात.

७) शैक्षणिक साधने दाखविण्याबद्दल कल्पना सुचविणे व साधनांच्या उपलब्धतेची माहिती देणे याबाबी दोन्ही मार्गदर्शनात होतात.

८) शिक्षक कृतीवरील चर्चेत प्राध्यापक अवांतर माहिती देतात.

९) मूल्यमापन प्रश्नासंदर्भात दोन्ही मार्गदर्शनात - उद्दिष्टे, पाठ्यांशानुसार प्रश्न,काही प्राध्यापक प्रश्न रचना,प्रकार,लघुत्तरी,दीर्घोत्तरी, वस्तुनिष्ठ इ.व क्रम यावर चर्चा करतात.

१०) स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असल्यास ती मार्गदर्शन व चर्चेतून सुचवितात. काही प्राध्यापक स्वाध्यायात बदल करा अशी सूचना देतात.

११) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनात फलक लेखनावरील चर्चेत लेखन शुद्ध,नेमके,सुवाच्य,दोन भागात, मुद्दे,उपमुद्दे,प्रमाणबद्ध व घटक,इयत्ता,दिनांक लिहिणे यावर चर्चा केली जाते.

१२) पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनासाठी आला तर मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ रद्द करतात.मार्गदर्शन देत नाहीत. काही प्राध्यापक मात्र रागावतात,पण मार्गदर्शन देतात.

१३) मार्गदर्शनात सर्व घटकांवर लक्ष दिले जाते.मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतला जातो.तसेच पाठ टाचण चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात मार्गदर्शक सुधारणा करतात.

१४) पाठ मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली तर न रागावता मार्गदर्शन दिले जाते व दुरुस्ती करुन घेतात. काही प्राध्यापक अधिक वाचन करुन मग मार्गदर्शनास या असे सांगतात.

१५) मार्गदर्शक विद्यार्थी-शिक्षकाकडे अधिक वाचन,अभ्यास,साधने यांचा आग्रह धरतात.

१६) बहुसंख्य मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शक व विद्यार्थी-शिक्षकाच्या मते मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

भेद --

१) त्रोटक पाठ टाचण असल्यास मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक त्रोटक भागावर मार्गदर्शन देतात.

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत, प्रथम ते पूर्ण करण्यास सांगतात, काही प्राध्यापक मात्र समस्या विचारुन त्या भागावर चर्चा करुन मग पूर्ण करण्यास सांगतात. यासंबंधी प्रथम काही सूचना दिल्या जातात,त्यामध्ये मराठीचे मार्गदर्शक आशय,पद्धती,उद्दिष्टे स्पष्टीकरणे,साधने,मूल्यमापन यावर तर भूगोलात मुद्देसुदपणा,उद्दिष्टे,पूर्वज्ञान,शिक्षक,विद्यार्थी कृती,मूल्यमापन, पाठ्यांशाचे सखोल वाचन यावर सूचना देतात व टाचण पूर्ण करायला सांगतात.

२) क्रम भिन्न आहे,मार्गदर्शनाचे घटक कोणत्या क्रमाने मार्गदर्शनास येतात यात क्रम सारखा नाही.

३) पूर्वज्ञानावर चर्चा करताना गृहीत पूर्वज्ञानावर प्रेरणा निर्माण होणे, घटक ,मागील इयत्ता व ज्ञान यावर मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न विचारतात.

भूगोलामध्ये पूर्वीचा पाठ,इयत्ता,आशय,पूर्वानुभव तसेच विशिष्ट पूर्वज्ञान गृहीत धरणे त्यावर प्रेरणा निर्माण होणे यावर प्रश्न विचारतात.

मागील पूर्वज्ञानासंदर्भात मागील संदर्भ न आल्यास मराठीमध्ये तो वाचायला सांगितला जातो; तर काही प्राध्यापक स्वत: सांगतात.

पण इतिहास मार्गदर्शनात मात्र पूरक प्रश्नाव्दारे संदर्भाची माहिती देतात,काही प्राध्यापक संदर्भ शोधा असे सांगतात.

४) प्रेरणा सुचत नसल्यास मराठी मार्गदर्शक ती स्वत: सांगतात तर काही प्रश्न चर्चेतून प्रेरित करतात.मात्र भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्नातूनच विद्यार्थी-शिक्षकाला विचारप्रवृत्त करतात.

५) अध्यापन मुद्दयावरील चर्चेत विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण आले नाही तर मराठीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ते कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. मात्र पाठ टाचण व्यवस्थित, पण स्पष्टीकरण येत नसल्यास विद्यार्थी-शिक्षकाला अधिक वाचन करायला सांगतात. घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

भूगोल पाठ मार्गदर्शक मात्र स्पष्टीकरण न आल्यास पुन्हा वाचन करा व नंतर मार्गदर्शन घ्या असे सांगतात. काही प्रश्न,उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करण्यास विद्यार्थी-शिक्षकाला प्रवृत्त करतात, पण पाठ टाचण व्यवस्थित आहे पण विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण येत नसल्यास स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन देतात. घटकाशी निगडित आशय सांगतात.

६) उद्दिष्टे व स्पष्टीकरण चर्चा करताना मराठी पाठ मार्गदर्शनात अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती काढण्यास सांगतात.काही प्राध्यापक ती चर्चेतून लक्षात आणून देतात.

भूगोल पाठ मार्गदर्शनात ती उद्दिष्टे चर्चेतून सुचवितात.काही प्राध्यापक अधिक उद्दिष्टे काढा अशी सूचना देतात.

७) शिक्षक कृती या घटकामध्ये महत्त्वानुसार दिलेल्या क्रमामध्ये कथन - विद्यार्थी सहभाग - प्रश्न व कथन - प्रश्न - विद्यार्थी सहभाग असा क्रम भिन्न आहे.

८) विद्यार्थी कृतीमध्ये प्रश्न,पूर्ण वाक्यात उत्तरे व विद्यार्थी प्रेरणा यावर चर्चा होते.

भूगोलात विद्यार्थी वयोगट, भाषा, शाब्दिक ,कृतियुक्त सहभाग,प्रश्न, साधने तसेच शिक्षक कृतीनुसार विद्यार्थी कृती या बाबींवर चर्चा होते.

९) स्वाध्यायावरील मार्गदर्शनात मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्यघटक व त्याचे दृढीकरण करणारा स्वाध्याय यावर चर्चा करतात.

भूगोलामध्ये पाठ्य घटक,शिक्षककृती व मूल्यमापन यातील प्रश्न नसणे, पाठाचा गोषवारा असणारा,वयोगटानुसार सोपा,कृतीप्रधान,छोटा,पाठ्यांशाचे दृढीकरण करणारा उद्दिष्टपर,नकाशा,आकृती,निरीक्षण या बाबींवर स्वाध्यायात चर्चा करतात.

१०) फलक लेखनात - घटक,इयत्ता,दिनांक,शब्द,वाक्प्रचार यावर मराठीचे पाठ मार्गदर्शन. तसेच हेतुप्रश्न,फलक लेखन,सुवाच्य,रेखीव,रसळ रेघेत, वळणदार,सुव्यवस्थित असणे यावर लक्ष वेधतात.

भूगोलाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलकावर पाठयांशाचा सारांश, सर्व मुद्दे, उपमुद्दे यावर चर्चा व नियोजनबद्धता, मुद्देसूदपणा, मर्यादित, क्रमबद्ध लेखन, आकृती व मुद्दे, दोन भागात लिहिणे यावर लक्ष वेधतात.

११) मार्गदर्शनात दिल्या जाणाऱ्या वेळानुसार येणारा क्रम म्हणजे दिला जाणारा वेळ भिन्न आहे.

१२) मराठीमध्ये शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती दिली जाते. भूगोलात ती दिली जात नाही. तसेच एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग मराठी प्राध्यापक अल्प प्रमाणात घेतात पण भूगोलाचे पाठ मार्गदर्शक मध्यम घेतात. काही प्राध्यापक तो अजिबात घेत नाहीत.

मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शन --

साम्य :

१) पाठ टाचण न काढता विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास गेल्यास मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शक टाचण काढल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. काही प्राध्यापक टाचण काढण्यातील अडचणी विचारून मार्गदर्शन देतात.

२) त्रोटक पाठ टाचण असेल तर, त्रोटक भागावरील अडचणी विचारून त्या भागावर मार्गदर्शन दिले जाते. त्याचप्रमाणे ते पूर्ण करण्यापूर्वी आशय, पद्धती, उद्दिष्टे व शैक्षणिक साधने यावर सूचना दिल्या जातात.

३) पूर्वज्ञानासंदर्भात चर्चा करताना पाठयांश व पूर्वज्ञानाची सांगड या बाबींवर चर्चा करतात. शास्त्रात विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान अजमावले जाते. त्याचप्रमाणे मागील इयत्ता, पाठ, त्यातील ज्ञान व या घटकाशी संबंध यावर प्रश्न विचारले जातात.

४) प्रेरणेवरील मार्गदर्शनात घटकाला दिल्या जाणाऱ्या महत्त्वानुसार क्रम - घटकानुरुपता, प्रेरणा देणाऱ्या कृती, प्रेरणेची हेतुकथनाशी सांगड व प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे समान आहे.

५) पाठ टाचणात मुद्दे व उपमुद्दे नसल्यास ते लिहिल्याशिवाय मार्गदर्शन दिले जात नाही. तसेच अध्यापन मुद्दयावरील चर्चेत प्रत्येक मुद्दयावर चर्चा होते, त्या दरम्यान अवांतर वाचन दिले जाते. मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारले जाते, घटकाशी निगडित आशय सांगितला जात नाही.

६) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे या वरील चर्चेत उद्दिष्टे घटकानुरुप असणे व ३५ मिनिटांत साध्य होणारी, काही प्राध्यापक नेमकी योग्य लिहिणे, एकवचनी, वर्तमानकाळी, विधान स्वरुप या बाबी पाहतात. अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती लिहिण्याची सूचना मराठी व शास्त्र मार्गदर्शक प्राध्यापक देतात, मात्र काही प्राध्यापक ती चर्चेतून निदर्शनास आणतात.

७) शैक्षणिक साधनांच्या नियोजनासंबंधी ती दाखविणे, कल्पना व उपलब्धता यावर माहिती देतात.

८) शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देतात.

९) मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनात मूल्यमापनावरील प्रश्नासंदर्भात पाठयांश घटक, उद्दिष्टे यानुसार प्रश्न, प्रश्न प्रकार यावर चर्चा होते, मूल्यमापन प्रश्नाचे स्वरुप सांगतात.

१०) स्वाध्याय चर्चेत - घटक, त्याचे दृढीकरण, तसेच शास्त्रात काही प्राध्यापक परिसरसंबंध, आराखडा, शैक्षणिक साधन व गोडी, क्रियाशीलता यावर भर देतात. विद्यार्थी-शिक्षकाच्या स्वाध्यायात बदल हवा असल्यास तो चर्चेतून सुचविला जातो, काही प्राध्यापक बदल स्वत: सांगतात.

११) फलक लेखनावरील मार्गदर्शनात महत्त्वाचे मुद्दे, संकल्पना, सारांश यावर चर्चा होते. काही प्राध्यापक लेखन सुवाच्यता, आकृती व तिची नावे यावर चर्चा करतात.

१२) पाठ उथा आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनासाठी आला तर मराठी व शास्त्राचे पाठ मार्गदर्शक ,मार्गदर्शन दोन दिवस आधी घेण्यासंबंधी सूचना देऊन पाठ रद्द करतात.

१३) मार्गदर्शनात सर्व घटकांकडे लक्ष दिले जाते,विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतला जातो व अन्य विद्यार्थ्यांचा अल्प सहभाग घेतला जातो. पाठ टाचण चुकीचे वाटल्यास आहे त्या टाचणात सुधारणा करतात.तसेच विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास न रागावता प्रश्न विचारुन बरोबर उत्तरे काढून घेतात. मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

१४) बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या मते मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

मेद :

१) मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात.

तर शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आशय पाठ्य मुद्दयापासून करतात.

२) पाठ मार्गदर्शनात घटकाला दिला जाणारा क्रम भिन्न आहे.

३) पूर्वज्ञानावरील मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाला मागील संदर्भ देता न आल्यास मराठीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक संदर्भ वाचण्यास सांगतात काही संदर्भ स्वत: सांगतात.

शास्त्र पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मात्र उदाहरणे,पूरक प्रश्न योग्य संदर्भ यावर चर्चा करुन लक्षात आणून देतात.

४) प्रेरणा सुचत नसेल तर मराठी मार्गदर्शनात प्राध्यापक प्रेरणा स्वत: सांगतात,काही प्रश्न चर्चेतून प्रेरित करतात.

शास्त्रामध्ये बहुसंख्य प्राध्यापक प्रेरणेसंबंधी प्रश्न विचारुन विचाराला चालना देतात.

५) अध्यापनमुद्दयावरील चर्चेत विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण आले नाही तर मराठी पाठाचे मार्गदर्शक ते कसे करावे यावर मार्गदर्शन देतात.

शास्त्राचे मार्गदर्शक मात्र विद्यार्थी-शिक्षकाला पाठाचे परत वाचन, काळजीपूर्वक अभ्यासाची जाणीव देतात.

६) पाठ टाचण व्यवस्थित लिहिले पण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर , स्पष्टीकरण न आल्यास मराठी पाठ मार्गदर्शक विद्यार्थी-शिक्षकाला अधिक वाचन करायला सांगतात.

मात्र शास्त्र पाठ मार्गदर्शनात प्रश्न चर्चेतून स्पष्टीकरण कसे करावे यावर मार्गदर्शन दिले जाते.

७) शिक्षक कृतीवरील चर्चेमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आशय, स्पष्टीकरण यावर मार्गदर्शन करतात.

मात्र शास्त्र मार्गदर्शनात - पाठ्यक्रमानुसार कृतिक्रम, प्रश्न, शैक्षणिक साधने, त्याचे नियोजन यांवर चर्चा होते. काही प्राध्यापक प्रश्न, प्रयोग, स्पष्टीकरण यातील सुसंगती यावर चर्चा करतात. त्याचप्रमाणे मराठीत - कथन - प्रश्न- विद्यार्थी-सहभाग व शैक्षणिक साधन तर शास्त्रात विद्यार्थी सहभाग - प्रश्न - शैक्षणिक साधन - कथन असा भिन्न क्रम आहे. सुचविलेल्या घटकामध्ये फलक लेखनाशिवाय शास्त्रात निरीक्षण व दिग्दर्शन हा शिक्षक-कृतीतील अन्य घटक आहे.

८) विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनात मराठीमध्ये, प्रश्न उत्तर पूर्ण वाक्यात व विद्यार्थी प्रेरणा यावर भर देतात.

शास्त्रामध्ये मात्र कृतींचा बोध, काही प्राध्यापक विद्यार्थ्यांचा कृतियुक्त, शाब्दिक, सहभाग व त्याची ठिकाणे यांवर चर्चा करतात.

९) मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप मराठी मार्गदर्शनात सांगितले जात नाही, शास्त्रात सांगितले जाते.

१०) फलक लेखन चर्चेत मराठी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक लेखन मुद्देसूद, सुवाच्य, चांगले, फलकाच्या दोन भागात असणे यावर चर्चा करतात. तसेच हेतुप्रश्न सुवाच्यता, रेखीवता, वळणदारपणा, लेखन सरळ रेषेत येणे या संबंधी सूचना देतात. ( या बाबींवर लक्ष वेधतात ).

शास्त्र पाठ मार्गदर्शक अर्थपूर्ण मुद्दयांचे लेखन, शुध्दलेखन, सुवाच्यता, आकृत्या व त्यांना नावे देणे यावर चर्चा करतात. तसेच सर्व मुद्दयांचा समावेश, मुद्दे कमी वा अधिक करणे, आकृती, लेखन शुद्धता यावर सूचना देतात.

११) मार्गदर्शनात घटकाला दिल्या जाणा-या वेळानुसार क्रमामध्ये ६ ते १० घटकामध्ये पूर्ण फरक आहे. या घटकात मराठीत शैक्षणिक साधनाकडे तर शास्त्रात संकलन, उपयोजन, फलक लेखन या घटकांकडे दुर्लक्ष होते.

<u>मराठी व गणित पाठ मार्गदर्शन --</u>

<u>साम्य :</u>

१) मराठी व गणित अध्यापनपद्धतीच्या पाठ मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढता आल्यास, प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम कच्चे टाचण हवे तसेच त्रोटक टाचण काढण्यापूर्वी दोन्ही मार्गदर्शनामध्ये आशय, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शैक्षणिक साधने, पूर्वज्ञान, मूल्यमापन यावर लक्ष वेधतात. मार्गदर्शनास सुरवात करताना प्रथम पूर्वज्ञानापासून केली जाते.

२) पूर्वज्ञानासंदर्भात चर्चा करताना गणित व मराठी पाठ मार्गदर्शनात पूर्वज्ञान व घटक यांच्या संबंधावर चर्चा करतात. काही प्राध्यापक मागील इयत्ता, पाठ, इतर विषय, दैनंदिन अनुभव यावर मार्गदर्शन देतात.

३) प्रेरणा विद्यार्थ्याला सुचत नसल्यास प्राध्यापक स्वत: तयार करुन देतात (सांगतात), तसेच प्रेरणेतील घटकांचा महत्त्वानुसार क्रम, घटकानुरुपता, प्रेरणा देणा-या कृती, हेतुकथनाशी प्रेरणेची घातलेली सांगड व प्रेरणेचा परिणाम असा समान आहे.

४) अध्यापन मुद्दयांवरील चर्चेत प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात. दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात, तसेच मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात, ते न आल्यास स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन देतात. काही स्पष्टीकरण स्वत:च करतात. पाठाचा सविस्तर आशय सांगतात, मात्र प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

५) शैक्षणिक साधने दाखविण्यास सांगणे,कल्पना सुचविणे,उपलब्धतेची माहिती देणे या बाबी दोन्ही मार्गदर्शनात होतात.

६) शिक्षक कृतीवरील चर्चेच्या दरम्यान प्राध्यापक अवांतर माहिती देतात. मूल्यमापन प्रश्नावरील चर्चेत प्रश्नांचे स्वरुप सांगतात.स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असल्यास ती चर्चेतून - सुचवितात.पाठ मार्गदर्शनात सर्व घटकांकडे लक्ष देतात, एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थ्यांचा अल्प सहभाग प्राध्यापक घेतात,पाठ टाचण चुकीचे वाटले तर आहे त्या टाचणात सुधारणा करतात.

चर्चेमध्ये विद्यार्थी-शिक्षकाने चुकीचे उत्तर दिल्यास दोन्ही मराठी व गणित पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न विचारुन बरोबर उत्तराप्रत विद्यार्थी-शिक्षकाला आणतात.काही प्राध्यापक मात्र तयारी करुन मग मार्गदर्शन घ्यायला सांगतात.तसेच विद्यार्थी-शिक्षकाकडून प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,साधन यांचा आग्रह धरतात.

बहुसंख्यांच्या मते - मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

भेद --

१) त्रोटक पाठ टाचण घेऊन विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनासाठी आल्यास मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक त्रोटक भागावर चर्चा व मार्गदर्शन करतात व नंतर पूर्ण करायला सांगतात.

गणित पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत.काही प्राध्यापक अपूर्ण भागावर चर्चा करतात.

२) पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शन दिल्या जाणाऱ्या घटकाचा मराठीतील व गणितातील क्रम भिन्न आहे.

३) पूर्वज्ञानावर मार्गदर्शन देताना मराठीमध्ये पूर्वज्ञान व प्रेरणा यांचा संबंध,मागील इयत्ता,लेखक,पाठ्यपुस्तके यावर लक्ष वेधतात.मागील संदर्भ विद्यार्थ्यांला येत नसल्यास तो वाचायला सांगतात,काही प्राध्यापक स्वत: सांगतात.

गणित पाठ मार्गदर्शनात मागील इयत्ता,पाठ,त्यातील ज्ञान यावरच लक्ष वेधतात.तसेच मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला येत नसेल तर स्वत: सांगतात

काही प्राध्यापक मात्र तो शोधायला, वाचायला सांगतात.

४) अध्यापन मुद्दयांवरील चर्चेत पाठ टाचणात मुद्दे, उपमुद्दे नसल्यास मराठीमध्ये मुद्दे व उपमुद्दे काढल्याशिवाय मार्गदर्शन दिले जात नाही, काही प्राध्यापक ते काढण्यासंबंधी मार्गदर्शन करतात.

गणित पाठ मार्गदर्शनात मुद्दे, उपमुद्दे कसे काढावेत यासंबंधी मार्गदर्शन देतात. काही प्राध्यापक मात्र ते लिहा, त्याशिवाय मार्गदर्शन नाही असे सांगतात.

या चर्चेमध्ये विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण विचारल्यास त्याला ते देता आले नाही तर मराठी मार्गदर्शक ते कसे करावे याचे मार्गदर्शन देतात तर गणित प्राध्यापक स्पष्टीकरण स्वत: करतात.

५) पाठ टाचण व्यवस्थित पण प्रश्न विचारल्यास विद्यार्थी-शिक्षक उत्तर देऊ न शकल्यास मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन करायला सांगतात.

गणित पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूरक प्रश्न विचारुन विद्यार्थी-शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवितात.

६) उद्दिष्टांवरील चर्चेमध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक त्यांची घटकानुरुपता व नेमके व योग्य लेखन यावर भर देतात.

गणितामध्ये उद्दिष्टे घटकानुसार व स्पष्टीकरणे उद्दिष्टानुसार व क्रम यावर चर्चा करतात.

पाठ्यघटकाला अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास मराठी पाठ मार्गदर्शक ती काढायला सांगतात. काही प्राध्यापक चर्चेतून लक्षात आणून देतात. गणित पाठ मार्गदर्शनात बहुसंख्य प्राध्यापक ती चर्चेतून लक्षात आणून देतात व काही काढायाची सूचना देतात.

७) शिक्षक कृतीतील मार्गदर्शनात मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आशय, प्रश्न, शैक्षणिक साधने व अध्यापन मुद्दे यावर चर्चा करतात.

गणितामध्ये प्रश्न,कथन,शैक्षणिक साधने यांचा मुद्दयांप्रमाणे वापर करण्यासंबंधी मार्गदर्शन करतात.शिक्षक कृतीमध्ये असलेल्या घटकांचा क्रम भिन्न आहे. प्रश्न - कथन गणितात,तर कथन - प्रश्न मराठीत क्रम आहे.

अन्य घटकात फलक लेखनाशिवाय दिग्दर्शन व प्रबलन हे घटक सुचवितात.

८) विद्यार्थी कृतीमध्ये प्रश्न,पूर्ण वाक्यात उत्तरे,विद्यार्थी,प्रेरणा यावर मराठी पाठ मार्गदर्शनात चर्चा होते.

गणितात विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग,अध्यापनात उपयोग,कृती प्रवृत्त करणे,शाब्दिक,कृतियुक्त सहभाग अशी चर्चा होते.

९) मूल्यमापनसंदर्भात प्रश्नावर मार्गदर्शन देताना मराठी पाठाचे प्राध्यापक उद्दिष्ट,पाठयांश ,प्रश्न प्रकार,रचना व त्यांचे स्वरुप यावर चर्चा करतात.

गणितात प्रश्न उद्दिष्टानुसार ज्ञान,आकलन व उपयोजन या बाबींनुसार चर्चा होते.

१०) फलक लेखनावरील मार्गदर्शनात मराठीमध्ये मुद्देसुदपणा,शुद्ध, सुवाच्य अक्षर,घटक,इयत्ता,दिनांक,शब्द,वाक्प्रचार यांच्या लेखनावर चर्चा होते.

गणितामध्ये मुद्दे,उपमुद्दे,आकृत्या,उदाहरणे यावर चर्चा करतात.काही फलकाच्या दोन भागात लेखन,यावर चर्चा करतात. त्याचप्रमाणे त्यावरील सुधारणा सांगताना मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक हेतु-प्रश्न,सुवाच्य रेखीव,वळणदार,सरळ रेषेत व सुव्यवस्थित लेखन यावर लक्ष वेधतात.

गणितामध्ये मात्र लेखन मुद्देसूद,घटक,उपघटक,दिनांक यांच्या लेखनावर लक्ष वेधतात.काही प्राध्यापक फलकाचे दोन भाग,त्यात उदाहरणे,अधोरेखन यावर भर देतात.

११) पाठ उद्दया व विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण मार्गदर्शनास आला तर मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ रद्द करतात.मार्गदर्शन देत नाहीत,काही प्राध्यापक असे पुन्हा न होण्याची समज देतात व मार्गदर्शन करतात.

गणित मार्गदर्शक पुन्हा असे न करण्याची समज देऊन मार्गदर्शन करतात, काही पाठ रद्द करतात.

१२) मार्गदर्शनात अधिक वेळ ज्या घटकांना दिला जातो त्याचा कम भिन्न आहे. मराठीमध्ये फलक लेखन, मूल्यमापन साधने, शैक्षणिक साधने याकडे दुर्लक्ष होते तर गणितात, फलक लेखन, मूल्यमापन साधने, संकलन व शैक्षणिक साधने यांकडे दुर्लक्ष होते. एका मार्गदर्शनात विद्यार्थ्यांचा सहभाग मराठीत खूपच, तर गणितात तो मध्यम प्रमाणात घेतात.

पाठ मार्गदर्शनाच्या निरीक्षण, प्रवाह तक्ते व प्रश्नावली यांच्या प्रतिसादानुसार साम्य भेदांचा अभ्यास केला.

प्रत्येक पाठ मार्गदर्शनाचे स्वरुप स्पष्ट करणारे चित्र आणि मराठीचे अन्य पद्धतींशी असलेल्या साम्य-भेदाचे स्वरुप यावरुन मराठी पाठ मार्गदर्शनाची तत्त्वे व परिणामकारक पद्धती निश्चित करता येतील, त्याचा उहापोह पुढील भागात केलेला आहे.

## विभाग-३


## मराठी पाठ मार्गदर्शक तत्त्वे व पद्धतीची निश्चिती --

मराठी पाठनियोजनाची मार्गदर्शक तत्त्वे व पद्धती निश्चित करण्यासाठी काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील हे प्रश्न विविध अंगांशी निगडित असू शकतील.

सध्या बहुतांशी शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये ब्ल्यूमच्या मूल्यमापन तंत्राचा प्रभाव दिसून येतो ते तंत्र टायलरच्या एकरेषीय प्रतिमानावर ( *Linear Model* ) आधारलेले आहे. त्यानुसार हा क्रम आकृती क्र.४.८ मध्ये दिलेले आहे.

आकृती क्र.४.८

टॅायलरच्या मूल्यमापन प्रतिमानानुसार मार्गदर्शनाचे घटक व क्रम --



मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये या प्रतिमानातील घटकांचा विचार होतो का ? व तो याच क्रमाने होतो का ? या प्रश्नांचा शोध घ्यावा लागेल. या प्रतिमानांचा आशय,उद्दिष्टे,अध्ययन अनुभव (शिक्षक कृती व विद्यार्थी कृती ) आणि मूल्यमापन हे चार घटक अत्यंत्र महत्त्वाचे मानले जातात ,तसे महत्त्व मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये दिले जाते का ? या चारीही घटकांवर समान भर दिला जातो का ? आणि तसा तो नसल्यास कोणत्या घटकावर अधिक भर दिला जातो ? हे पहावे लागेल.या प्रश्नांच्या संदर्भात तसेच या अनुषंगाने येणाऱ्या अन्य उपप्रश्नांच्या संदर्भात मराठी पाठ मार्गदर्शनाची तुलना अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाशी केली असता मराठी पाठ मार्गदर्शनाचे वेगळेपण व खास वैशिष्टये स्पष्ट होतील व त्या आधारे मराठी पाठ मार्गदर्शनाची तत्त्वे व परिणामकारक पद्धती निश्चित करता येतील. मराठी किंवा अन्य पाठ मार्गदर्शनाचा अभ्यास दोन अंगानी करावा लागेल.

१) मार्गदर्शनाचा आशय (मार्गदर्शनात कशा विषयी चर्चा किंवा विचार होतो )

२) मार्गदर्शनाची प्रक्रिया म्हणजेच मार्गदर्शक आणि छात्राध्यापक यांच्यात घडणाऱ्या आंतरक्रियेचे स्वरुप.

ही दोन अंगे समोर ठेवून पाठ मार्गदर्शन-विश्लेषण गट-पद्धती हे साधन संशोधिकेने निवडले होते.(त्याची सविस्तर माहिती प्रकरण क्र.३ मध्ये दिलेली आहे.) या गट पद्धतीतील २ ते १४ घटक हे पाठ मार्गदर्शनाच्या आशयाशी निगडित आहेत.तर १५ ते १८ हे घटक पाठ मार्गदर्शनाच्या काळातील आंतरक्रियेशी निगडित आहेत. या सर्व गटांशी निगडित अनेक उपप्रश्न निर्माण होऊ शकतात,त्या प्रश्नांच्या उत्तरातून मराठी पाठ मार्गदर्शनाची परिणामकारक पद्धती निश्चित करता येते हा प्रयत्न पुढे केलेला आहे.

१) <u>एक रेषीय प्रतिमान आणि मराठी पाठ मार्गदर्शन</u> -

एक रेषीय प्रतिमानानुसार चार घटक महत्त्वाचे मानले जातात.या चार घटकांना विविध विषयांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये महत्त्व दिले जाते असे नाही. उदा.इतिहास,विज्ञान व गणित विषयाच्या पाठ मार्गदर्शनामध्ये अनुक्रमे मूल्यमापन

व उद्दिष्टे यांच्यापेक्षा प्रेरणेस अधिक महत्त्व दिले जाते. मराठी पाठ - मार्गदर्शनामध्ये मात्र एक रेषीय प्रतिमानानुसार अपेक्षित असलेल्या चार घटकांना प्राधान्य दिले जाते. यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

१.१) आशय,उद्दिष्टे ,अध्ययन अनुभूती (शिक्षक कृती व विद्यार्थी कृती ) व मूल्यमापन या चारही घटकांना एकरेषीय प्रतिमानानुसार मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये महत्त्वपूर्ण स्थान देण्यात यावे.

एक रेषीय प्रतिमानानुसार आशय,उद्दिष्टे,अध्ययन अनुभव (शिक्षककृती व विद्यार्थी कृती ) व मूल्यमापन असा क्रम अभिप्रेत आहे. तसा तो विविध विषयांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये येईलच असे नाही. विशेषत: उद्दिष्टे आणि आशय यांच्या क्रमाची अदलाबदल होताना दिसते,मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये मात्र आशय आणि उद्दिष्टांचा एकत्रित व अतूटपणे विचार केला जातो.

१.२) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये आशय आणि उद्दिष्टे यांचा स्वतंत्र व क्रमाने विचार न करता एकत्रित व अतूटपणे विचार केला जावा.

आशय,उद्दिष्टे,अध्ययन अनुभूती (शिक्षक व विद्यार्थी कृती ) व मूल्यमापन या एक रेषीय प्रतिमानाच्या या चार घटकांवर विविध विषयांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये समान भर दिला जात नाही असे दिसून येते.हिंदीमध्ये उद्दिष्टांवर भर आहे तर शास्त्रामध्ये शिक्षक कृतीवर भर आहे व मराठीसह अन्य विषयामध्ये विषयज्ञानावर भर दिला जातो.

१.३) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये उद्दिष्टे,शिक्षक कृती व मूल्यमापन यांच्या तुलनेत विषयज्ञान या घटकांवर अधिक भर दिला जावा.

२) प्राथमिक माहिती :

प्राथमिक माहिती या घटकामध्ये घटक,उपघटक,इयत्ता,तुकडी,शाळा या-सारख्या मुद्दयांचा समावेश होतो. विविध पाठ मार्गदर्शन पद्धतींचा या

घटकासंदर्भात विचार करता असे दिसते की, मराठी अध्यापनपद्धतीत इतर पद्धतींच्या तुलनेत प्राथमिक माहितीची अधिक चर्चा होते. यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

२.१) मराठी माध्यमच्या संदर्भात पाठाचा घटक, उपघटक, इयत्ता, शाळा, तिची गुणवत्ता, परिसर, विद्यार्थ्यांची गुणवत्ता व त्यांचा परिसर, माध्यमिक स्तर या बाबींना महत्त्वाचे स्थान असण्याची शक्यता आहे. म्हणून मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्राथमिक माहितीवर सविस्तर चर्चा करावी.

३) पूर्वज्ञान, प्रेरणा व हेतुकथन :

मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये इतर विषयांप्रमाणेच पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनाची सुरवात केली जाते. तसेच या घटकावर आवश्यक तितका व मर्यादित भर दिला जातो. मात्र मराठी विषयात पूर्वज्ञानाची प्रेरणेशी नेहमी सांगड घातली जाते. घटकानुरुपता, प्रेरणा देणाऱ्या कृती, प्रेरकता व परिणामकारकता ही चांगल्या प्रस्तावनेची वैशिष्टये मराठी प्रेरणेत लागू पडतात. मात्र अन्य पाठ मार्गदर्शनात प्राध्यापक त्यावर चर्चा करतात तर मराठी विषयाचे पाठ मार्गदर्शक काही वेळेस ती स्वत: सांगतात. यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

३.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये पूर्वज्ञान या सुरवातीच्या घटकावर आवश्यक व मर्यादित भर देऊन त्याची अपरिहार्यतेने प्रेरणेशी सांगड घालावी.

३.२) प्रस्तावना ही अनुरुप, प्रेरक, परिणामकारक असावी, यासाठी मार्गदर्शन करावे. मात्र अशी प्रेरणा विद्यार्थी-शिक्षकाला न सुचल्यास नमूना म्हणून मार्गदर्शकाने स्वत: योग्य प्रेरणा सांगावी.

४) शैक्षणिक साधन :

इंग्रजी, गणित विषयांच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शैक्षणिक साधनांची अधिक चर्चा केली जाते. शैक्षणिक साधनांचा पाठ नियोजनात

समावेश केला नसेल तर मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ती दाखविण्याचा आग्रह धरतात, त्याच्या उपलब्धतेची माहिती सांगतात व कल्पना सुचवितात, मात्र शास्त्रामध्ये मराठीपेक्षा शैक्षणिक साधनावर अधिक चर्चा होते. यावरून पुढील तत्त्व मांडता येईल.

४.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शैक्षणिक साधनांची मर्यादित व आवश्यकतेनुसार चर्चा करावी, जेथे आवश्यकता आहे तेथे शैक्षणिक साधनांचा आग्रह धरावा, या चर्चेमध्ये पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांनी शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेची माहिती द्यावी, त्यांच्या कल्पना सुचवाव्यात व ती साधने प्रत्यक्ष कशी वापरावीत याचे मार्गदर्शन करावे.

५) विषयज्ञान :

मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान या घटकावर इतर विषयांच्या तुलनेत जास्त भर दिला जातो व प्रामुख्याने हा भर चर्चेव्दारे दिला जातो. चर्चेमध्ये भाषेच्या दृष्टिकोनातून म्हणजे शब्दसंग्रह, वाक्प्रचार, अलंकार, म्हणी या संदर्भात, वाङ्‌मय साहित्याच्या दृष्टिकोनातून म्हणजे लेखक, त्यांची शैली, मूळ साहित्य-प्रकृती या संदर्भात, तसेच रसग्रहण, अभिरुची, अभिवृत्ती, मूल्यनिर्मिती (संस्कार) या उद्दिष्टांच्या संदर्भात विचार करणे अपरिहार्य ठरते. विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचनाची गरज असते, त्यादृष्टीने चर्चा करावी लागते.

५.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान या घटकावर अधिक वेळ चर्चा केली जावी व ती चर्चा भाषा प्रभुत्व, साहित्याची जाण व नैतिक मूल्ये व संस्कार या दृष्टीने होणे आवश्यक आहे.

६) पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे --

मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये आशय आणि उद्दिष्टांचा एकत्रित विचार केला जावा याचा उल्लेख यापूर्वीच केलेला आहे. मराठी भाषा ही साध्य व साधन अशारीतीने कार्य करत असल्याने या पाठाच्या उद्दिष्टात विविधता आढळते, त्यामुळे त्याबाबतीत विद्यार्थी-शिक्षकांशी चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते, या आधारे पुढील तत्त्वे मांडता येतील.

६.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये पाठाच्या उद्दिष्टात विविधता व संख्यात्मक वाढ करण्यासाठी मार्गदर्शन करावे.भाषिक अंग, साहित्यिक विचार व भावात्मक क्षेत्राचा विचार केला जावा.

६.२) उद्दिष्टांच्या मार्गदर्शनासाठी चर्चेचा अवलंब करावा,विशेषत: विद्यार्थी-शिक्षकाने लिहिलेल्या उद्दिष्टांत बदल सुचविल्यास त्या मागील कारणे स्पष्ट करावीत.

७) अध्यापनपद्धती :

अध्यापनपद्धती या घटकामध्ये सूत्रे,क्लृप्त्या,कौशल्ये,उद्गामी-अवगामी पद्धती आणि कथन,प्रश्नोत्तर,चर्चा,स्पष्टीकरण इ. पद्धतीविषयक चर्चा यांचा समावेश होतो.शास्त्राच्या तुलनेत मराठीची चर्चा कमी होत असली तरी इंग्रजी, भूगोलाच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनात अधिक चर्चा होते,तथापि एकंदरीत या घटकावर मोठा भर दिला जात नाही.

७.१) मराठी पाठ मार्गदर्शनात अध्यापन-पद्धतीवर मर्यादित व आवश्यक तितकी चर्चा करावी,ही करत असताना पाठ टाचणामध्ये त्या पद्धतींचा उल्लेख केला जाईल याचा आग्रह धरावा.

८) प्रश्न पद्धती :

अन्य विषयांच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्रश्न पद्धतीवर कमी बोलले जाते.विषय प्रतिपादनामध्ये प्रश्न साखळीच्या दरम्यान स्पष्टीकरण,कथन, वर्णन,उदाहरणे,दाखले असतात,तसेच विद्यार्थ्यांना अभिव्यक्तीत प्रवृत्त करण्याइतपत प्रश्न असतात.यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

८.१) प्रश्न पद्धती या घटकावर अन्य विषयांच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये कमी चर्चा होते.विषय प्रतिपादनामध्ये प्रश्न साखळी कथन,स्पष्टीकरण,वर्णन,उदाहरणे दाखल्यांचा वापर मराठीत जास्त असल्याने मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्रश्न पद्धतीवर मर्यादितच भर द्यावा.

९) अध्ययन अनुभव :

अध्ययन अनुभवामध्ये शिक्षक कृती व विद्यार्थी कृतीचा समावेश होतो, त्यापैकी शिक्षक कृती हा अधिक महत्त्वाचा घटक आहे.भूगोल,शास्त्र,गणित,इंग्रजी या विषयांमध्ये शिक्षक कृतीवरील पाठ मार्गदर्शनात अधिक चर्चा दिसते;पण मराठी मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृतीवर प्राध्यापक स्वत: अधिक माहिती देतात.मराठी पाठ मार्गदर्शनात शिक्षक कृतीमध्ये पाठाचे आदर्श वाचन,हेतुकथन,आशय,त्याचे स्पष्टीकरण,प्रश्न,शैक्षणिक साधने अशा स्वरुपाचे मार्गदर्शन करावे लागते,यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

९.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृती हा एक महत्त्वाचा घटक असून त्यामध्ये आदर्श वाचन,उच्चार,हेतुकथन,आशय,त्याचे स्पष्टीकरण,प्रश्न,शैक्षणिक साधने इ.बाबींचे घटकानुसार सखोल मार्गदर्शन करावे.आवश्यक तेव्हा पाठ-मार्गदर्शकाने चर्चेपेक्षा स्वत: मार्गदर्शन करण्यावर भर द्यावा.

१०) मूल्यमापन :

मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापन या घटकावर होणारी चर्चा ही शास्त्र व इतिहासापेक्षा अधिक होते. अन्य विषयातील मूल्यमापनावरील चर्चा ही मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये घडते त्या त्या प्रमाणातच होते.सर्वसाधारणपणे या घटकाची चर्चा मार्गदर्शनाच्या शेवटी होते.या चर्चेत मूल्यमापनातील प्रश्नावर प्रामुख्याने भर असतो.उद्दिष्टांनुसार,पाठयांशानुसार प्रश्न रचना योग्य आहे किंवा नाही किंवा उजळणीवजा प्रश्न आहेत का ? या बरोबरच पाठयांशाव्दारे मिळालेल्या संस्कारांचेही मूल्यमापन होते का?याचे मार्गदर्शन करावे लागते व तशा प्रश्नांचे स्वरुप सांगण्याची प्रवृत्ती आहे.

यावरुन पुढील तत्त्वे मांडता येतील.

१०.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापन हा महत्त्वपूर्ण घटक असून त्यामध्ये विचारावयाच्या प्रश्नांचे स्वरुप मार्गदर्शकानी स्पष्ट करावे.

१०.२) मूल्यमापनातील विचारावयाच्या प्रश्नांमध्ये दोन प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करावा.

अ) पाठ्यांशाची उजळणी करणारे प्रश्न व

ब) पाठ्यांशाव्दारे करावयाच्या संस्काराशी (भावात्मक अंगाशी ) निगडित प्रश्न.

या प्रश्नांची निश्चिती करताना चर्चेव्दारे ते निश्चित करता आले तर चांगलेच अन्यथा नमुन्या दाखल स्वत: तसे प्रश्न सांगावेत.


११) स्वाध्याय :

स्वाध्याय मार्गदर्शनात मराठीमध्ये इंग्रजीच्या तुलनेत कमी चर्चा होते. अन्य विषयांच्याबाबतीत मराठीसह सारखेपण आढळतो. स्वाध्याय हा पुढील कार्याच्या संदर्भात दिला जात असल्याने तो विद्यार्थी-शिक्षकांकडून तपासला जात नाही म्हणून त्याची चर्चा कमी होते,होणा-या चर्चेत उद्दिष्टे, स्वाध्याय विविधता, चित्र, निबंध, प्रश्न प्रकार,वाङ्मय प्रकार,अभिवृत्ती,अभिव्यक्ती, मनन, श्रवण वाढविणे यांचा विचार होतो.यावरुन पुढील तत्त्व मांडता येईल.

११.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये स्वाध्यायावर मर्यादित व आवश्यक तितकीच चर्चा करावी. या चर्चेमध्ये स्वाध्यायात विविधता कशी आणता येईल या विषयी मार्गदर्शन करावे.

१२) फलक लेखन :

फलक लेखनावरील मार्गदर्शनामध्ये इंग्रजी, इतिहासाच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनात अधिक चर्चा होते, तरी मर्यादित प्रमाणातच वेळ दिला जातो व हा चर्चेचा शेवटचा घटक असतो. या


मराठी
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (2)
रचनात्मक कृती (467)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (51)
प्राध्या. होकारात्मक कृती (10)
प्रति प्रश्न
प्राध्यापकांच्या नकारात्मक प्रतिसाद (77)
102
57
78
157
36
60
इतिहास
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (12)
रचनात्मक कृती (534)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (27)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद (1)
प्रति प्रश्न
प्राध्या. नकारात्मक प्रतिसाद (10)
138
117
41
120
48
21
20
शरीरशास्त्र
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (9)
रचनात्मक कृती (657)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (41)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद (8)
प्रति प्रश्न
प्राध्या. नकारात्मक प्रतिसाद. (18)
39
35
129
112
33
33
हिन्दी
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (19)
रचनात्मक कृती (412)
विद्यार्थी शिक्षक. प्रतिसाद (60)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद. (6)
प्रति प्रश्न
प्राध्यापकांच्या नकारात्मक प्रतिसाद (14)
25
114
38
28
26
56
भूगोल
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (26)
रचनात्मक कृती (402)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (112)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद (5)
प्रति प्रश्न
प्राध्या. नकारात्मक प्रतिसाद (15)
146
114
62
163
55
33
गणित
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (16)
रचनात्मक कृती (536)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (66)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद. (9)
प्रति प्रश्न
प्राध्या. नकारात्मक प्रतिसाद. (22)
166
159
69
220
69
41
24
इंग्रजी
अपेक्षात्मक कृती (प्रश्न) (7)
रचनात्मक कृती (244)
विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद (85)
प्राध्या. होकारात्मक प्रतिसाद. (2)
प्रति प्रश्न
प्राध्या. नकारात्मक प्रतिसाद. (29)
125
91
34
94
43
31
15
41
24

चर्चेत वाक्प्रचार, शब्द, म्हणी यांचे लेखन फळ्यावर नियोजनबद्ध, शुद्ध होणे, व्याकरणात यावर अधिक चर्चा होते, तसेच फलक लेखन सुधारण्यासाठी त्रुटीनुसार चर्चा केली जाते.

१२.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये फलक लेखन चर्चेसाठी मर्यादित व आवश्यक तितकाच वेळ द्यावा, या चर्चेमध्ये म्हणी, शब्द व वाक्प्रचार, शुद्धलेखन याची चर्चा करावी व त्रुटी, चुका दुरुस्त कराव्यात.

## १३) मराठी पाठ मार्गदर्शनाची प्रक्रिया :

मराठी पाठ मार्गदर्शन प्रक्रियेचा अभ्यास प्रवाह तक्ते व आंतरक्रियेची चके याद्वारे करता येतो. सातही विषयांच्या पाठ मार्गदर्शनाचे प्रवाह तक्ते आकृती क्र.४.९ मध्ये दिलेले आहेत.

त्यांचे निरीक्षण करता असे दिसून येईल की, मराठी व शास्त्र विषयांच्या प्रवाह तक्त्यामध्ये साम्य आहे. म्हणजेच अध्यापनपद्धती जरी भिन्न असल्या तरी मार्गदर्शनाच्या आंतरक्रियेतील आकृतीबंध समान असू शकतात, मात्र आशय भिन्न असतो, असे येथे दिसते. आंतरक्रियेमध्ये घडणाऱ्या चक्रांचा विचार करता असे दिसून येते की, मराठी, इंग्रजी, इतिहास, गणित पाठ मार्गदर्शनामध्ये अपूर्ण होकारात्मक लघुचक्रांचे प्रमाण जास्त आहे. प्रवाह तक्ते आणि चक्रे यांचा एकत्रित विचार करता पुढील तत्त्व मांडता येईल.

१३.१) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्राध्यापकांनी कमी प्रश्न विचारून विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलते करावे. विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रतिसादावर प्रामुख्याने होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करावी.

## सारांश :

प्रस्तुत संशोधन हे मराठी पाठ मार्गदर्शनाच्या परिणामकारक पद्धती निश्चित करण्यासाठी हाती घेण्यात आलेले होते. या संशोधनात मिळालेल्या सामुग्रीचे प्रस्तुत प्रकरणात तीन भागात विश्लेषण करण्यात आले. पहिल्या भागात मराठी पाठ मार्गदर्शन कसे केले जाते याचा शोध घेण्यात आला, दुस-या भागात मराठी पाठ मार्गदर्शनाची अन्य पाठ मार्गदर्शनाशी तुलना केली व या दोहोंच्या आधारे मराठी पाठ मार्गदर्शनाच्या परिणामकारकतेच्या दृष्टीने काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली. ही सर्व तत्त्वे पूर्णत: नवीन आहेत असे म्हणता येणार नाही. काही पाठ मार्गदर्शक यातील काही तत्त्वे जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणे वापरत असतीलही. पाठ मार्गदर्शनाच्या विविध घटकांशी निगडित असलेली ही तत्त्वे अधिक नेमकेपणाने व एकत्रितरित्या येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत व हेच या संशोधनाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.